


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १४० ●बुधवार, दि. २० ऑगस्ट २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# मराठवाडा, खानदेश, मुंबईसह पश्चिम महाराष्ट्राला पावसाने झोडपले

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, मुंबईसह खानदेशातील सर्व जिल्ह्यांत जनजीवन विस्कळीत झाले आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांना पावसाने झोडपून काढले आहे. मराठवाड्यात एकूण १ हजार ४ गावे अतिपावसामुळे बाधित झाली आहेत. यात सर्वाधिक ८४४ गावे ही एकट्या नांदेड जिल्ह्यातील आहेत. मुंबईत मुसळधार पावसामुळे अनेक भागात पाणी साचले आहे. तर खानदेशांत संततधार पावसामुळे शेती पिकांचे नुकसान झाले असून अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली आहे. पश्चिम महाराष्ट्रातही पावसामुळे राधानगरी, कोयना आणि चांदोली धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.



## ●मराठवाड्यात मुसळधार, अनेक ठिकाणी पूर परिस्थिती



मराठवाड्यातील जालना, संभाजीनगर, नांदेड, लातूर, हिंगोली, परभणी, बीड जिल्ह्यांत पावसाने कहर केला आहे. अनेक ठिकाणी पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. मराठवाड्यात एकूण १ हजार ४ गावे अतिपावसामुळे बाधित झाली आहेत. यात सर्वाधिक ८४४ गावे ही एकट्या नांदेड जिल्ह्यातील आहेत. हिंगोली जिल्ह्यातील येलदरी, इसापूर, सिद्धेश्वर धरणांतून पाण्याचा नदीपात्रात विसर्ग सुरू करण्यात येत आहे. सोमवारी सकाळी सिद्धेश्वर धरणाचे १२ दरवाजे उघडून ४५,५४८ क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला. परभणी जिल्ह्यातील येलदरी धरणाचे सोमवारी सकाळी ७.४५ वाजता एकूण १० दरवाजे अर्धा मीटरने उघडण्यात आले. यामुळे पूर्णा नदीपात्रात २११००.४० क्युसेसने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. तर जालना जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पडत असलेल्या संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. नांदेड जिल्ह्यात रविवार-सोमवारी अतिवृष्टी झाली. लेंडी नदीच्या पाणी पातळीत प्रचंड वाढ झाल्यानंतर मुखेड तालुक्यातील ९ गावे आणि परिसर जलमय झाला. हसनाळ येथील ५ व्यक्ती बेपत्ता झाल्या. त्यांचा शोध सुरू आहे. याच भागात रस्त्यावरच्या पुलावरून एक मोटार पाण्यात वाहून गेली. रविवार व सोमवारी लातूर जिल्ह्यात सर्वदूर पाऊस झाला असून तब्बल १७ महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली आहे. बीड जिल्ह्यात मागील २४ तासांपासून सर्वत्र मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. अनेक नद्या तुडुंब भरल्या आहेत. पुराच्या पाण्यामुळे काही गावांचा संपर्क तुटला आहे, तर काही ठिकाणी पूल खचल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे. या पावसात एक जण वाहून गेला असून अन्य तीन जणांना सुखरूप वाचवण्यात यश आले.

## ●सातारा, सांगलीतील धरणांतून विसर्ग



पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा आणि सांगली जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे धरणांतून पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे सोमवारी पहाटे सात स्वयंचालित दरवाजे खुले झाले असून सात दरवाजांतून १०,००० क्युसेक तर वीजगृहातून १५०० असा एकूण ११,५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग भोगावती नदीपात्रात होत आहे. सोमवारी दुपारी कोयना धरणाचे सहा वक्री दरवाजे दीड फुटांवरून तीन फूट, तर रात्री आठ वाजता पाच फूट वर उचलण्यात आले. त्यातून ३५,१०० क्युसेक पाणी पूर्वे कडे कोयना नदीच्या पात्रात सोडण्यात आले आहे. विसर्गामुळे कोयना नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाल्याने नदीकाठच्या गावांना सावधानतेचा इशारा दिला आहे. दरम्यान, धरणांत पाण्याची आवक वाढेल त्या पटीत पूर्वेकडे टप्प्याटप्प्याने जादा पाणी सोडणार असल्याची माहिती धरण व्यवस्थापनाने दिली आहे. तर सांगली जिल्ह्यातील चांदोली धरणातूनही पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. सांगली जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी ५.४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक १६.२ मिलिमीटर पाऊस शिराळा तालुक्यात झाला आहे. चांदोली धरणात १२२४४ पाण्याची आवक होत असून धरण ९१.८० टक्के भरलं आहे.

## ●खानदेशात सर्वदूर मुसळधार पाऊस



दोन दिवसांपासून जळगाव, नंदुरबार जिल्ह्यात सुरू असलेल्या धुवाधार पावसाने नदी-नाल्यांना पूरस्थिती उद्भवली असून शेती पिकांसह अनेक ठिकाणी घरांचे नुकसान झाले आहे. रावेर तालुक्यात भिंत अंगावर पडल्याने सात शेळ्यांचा मृत्यू झाला आहे. पातोंडा येथे घरात पाणी पुराचे पाणी घरात शिरल्याने अनेकांच्या संसार उपयोगी साहित्याचे नुकसान झाले आहे. नाशिक जिल्ह्यात मात्र श्रावण सरी बसरत असून बहुतांशी भागांत जोरदार पावसाची प्रतिक्षा आहे. जळगाव जिल्ह्याला रविवारी रात्री तसेच सोमवारी दिवसभर पावसाने चांगलेच झोडपून काढले. यामुळे केळी बागांसह इतर शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेतकर्यांचे पशूधन मृत्युमुखी पडल्याची घटना घडल्या आहेत. विशेषत रावेर, पाचोरा, बोधवड, गडगाव, जळगाव भागांत पावसाचा चांगलाच तडाखा बसला. नंदुरबार जिल्ह्यातील बहुतांशी भागातही जोरदार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे नद्या-नाल्यांना पूर आले आहेत. नाशिक जिल्ह्यातील बहुतांश भागात श्रावण सरी कोसळत असून अद्याप जोरदार पावसाची शेतकर्यांना प्रतिक्षा आहे. गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रांत झालेल्या समाधानकारक पावसाने जिल्ह्यातील धरणांत ८४ टक्के पाणीसाठा निर्माण झाला आहे.

# जिल्ह्यात सुरु असलेल्या अतिवृष्टी संदर्भात आ.क्षीरसागरांची जिल्हाधिकार्‍यांसमवेत बैठक

### नुकसानीचे पंचनामे आणि उपाययोजना करण्याची केली प्रशासनाकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून संपूर्ण बीड जिल्ह्यात अखंडित पाऊस पडत आहे. झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतातील पिकांबरोबरच पशुधनाचेही मोठे नुकसान झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी गावांना जोडणारे पूल वाहून गेले आहेत. या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी



जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासोबत बैठक घेऊन झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तातडीने

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडमधील शेतकरी संकटात; केंद्राकडून मदतीचा हात द्या

### खा.बजरंग सोनवणेंनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून केली मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून पाऊस जोरदार हजेरी लावत असून जिल्ह्यामधील बहुतेक सर्वच महसुल मंडळामधे अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. शेतातील पिके पाण्यात आहेत. दोन दिवसांपुर्वी खा.बजरंग सोनवणे यांनी थेट शेतात जावून नुकसानीची पाहणी केली होती. आज दि.१९ रोजी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची दिल्ली येथे भेट घेवून अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून मदतीचा हा द्या, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली.

बीड जिल्ह्यातील शेतकरी बांधवांवर अतिवृष्टीमुळे मोठे संकट ओढावले आहे. राहती घरे, पीक, पशुधन, शेतीजमीन तसेच फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे.या नुकसानीची दखल घेऊन शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून तातडीने मदत मिळावी, यासाठी खा.सुप्रिया सुळे यांच्या सोबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात संततधार आणि मुसळधार पावसाची नोंद झालेली असून जिल्ह्यातील नद्यांना पूर गेलेला आहे. नदीपात्रापासून एक किलोमीटर अंतरापर्यन्त पिके पाण्याखाली आहेत. पावसामुळे पिकांचे, शेतीचे आणि घरांची पडझड होवूनही मोठी हानी झालेली आहे. केज तालुक्यातील काही गावात मांजरा नदीच्या पात्रातील पाणी शिरले होते. या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे आणि शेतीचेही नुकसान झाले होते. यानंतर तातडीने खा.बजरंग



सोनवणे यांनी पूर्वनियोजीत दौरा रद्द करून शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतात जावून पिकांची आणि नुकसानीची पाहणी केली होती. शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांनी धीर दिला होता.

▶▶ उर्वरित पान २ वर

# दीड वर्षापासून क्लासवन अधिकाऱ्याचा जिल्हा बँकेच्या रेस्ट हाऊसमध्ये बेकायदेशीर मुक्काम

### चंबू गबाळ आजच आवरा अन्यथा आंदोलन: ॲड. अजित देशमुख





**बीड । प्रतिनिधी**

बीड येथे बदलून आलेले सहकार खात्याचे तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, बीड या पदावर कार्यरत असलेले अधिकारी श्री. घोडके गेल्या दीड वर्षापासून बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विश्रामगृहात बेकायदेशीर रितीने मुक्कामाला आहेत. त्यांनी आजच चंबू गबाळ आवरावे आणि अन्य ठिकाणी राहायला जावे. अन्यथा आम्हाला आंदोलन करावे लागेल, असा इशारा जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी दिला आहे. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, बीड ही सातत्याने वादाच्या भोवऱ्यात आहे. जिल्हा बँक शेतकऱ्यांची बँक राहिलेली नसून पुढार्यांची बँक झालेली आहे. त्यामुळे सातत्याने

▶▶ उर्वरित पान २ वर

# सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणाऱ्या अल्पवयीन मुलांना दामिनी पथकाने घेतले ताब्यात

**बीड । प्रतिनिधी**

दामिनी पथक शहरामधे नेहमीप्रमाणे पेट्रोलिंग करीत असताना, सारडा कॅपिटल सुभाष रोड येथील स्थानिक लोकांनी फोनद्वारे माहिती दिली की, शहरात एका सार्वजनिक ठिकाणी काही मुले एकत्र जमा होवून सिगारेट, बीडी ओढून धुम्रपान करत असतात, त्यामुळे नागरीकांना त्रास होत आहे व याचा परिणाम नागरी वस्तीतील मुलांवर होवू शकतो व महिला,



मुली यांचा सदर ठिकाणावरून येणे जाणे असल्याने त्या घाबरत आहेत, त्यावरून दामिनी पथकाने त्या ठिकाणी जाऊन खात्री केली असता, तेथे त्यांना बरेच मुलं

▶▶ उर्वरित पान २ वर




# पाटोदा महावितरणचा बेजबाबदारपणा! राष्ट्रीय महामार्गावर विद्युत डीपीमुळे नागरिकांचा जीव धोक्यात

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरातून जाणाऱ्या पाटोदा मांजरसुंभा राष्ट्रीय महामार्गावर महावितरण विभागाने थेट रस्त्याच्या कडेला विद्युत डीपी बसवून ठेवला आहे. या निष्काळजी कारभारामुळे वाहनधारकांच्या जीवावर बेतण्याची वेळ आली असून,



कधीही मोठा अपघात होऊ शकतो. डीपीजवळ मोठा खड्डा असून, तिथे कोणताही सूचना फलक, रिफ्लेक्टर किंवा सुरक्षेची चिन्हे बसवलेली नाहीत.याआधीच या ठिकाणी अपघात झाल्याचे स्थानिकांनी सांगितले असून, पुन्हा अशाच दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नागरिकांचा संताप उफाळून आला असून त्यांनी ठाम शब्दांत इशारा दिला आहे अपघात झाल्यास महावितरण विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण जबाबदार राहील. जीव गेला, तर अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला जाईल! स्थानिक नागरिक, सामाजिक संघटना महावितरणला अल्टिमेटम दिला आहे की,

मनुष्यहानी होण्याआधी ही डीपी तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवावा.अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरून पाटोदा महावितरणच्या बेजबाबदारपणा विरोधात तीव्र आंदोलन करावे लागेल.

# वारकरी चळवळीचे महानायक

## (राष्ट्रसंत संत शिरोमणी संत सेना महाराज पुण्यतिथी विशेष लेख)

महाराष्ट्र ही संताची भूमी आहे. या राज्यात अनेक संत होऊन गेले. संताची ही गौरवशाली परंपरा संत ज्ञानेश्वरांपासुन जगद्गुरु तुकारामापर्यंत सांगता येईल. नाभिक समाजात असेच एक संत होऊन गेले ते म्हणजे संत सेना महाराज

बाराव्या शतकात मध्यप्रदेशात विषमतेविरुध्द बंड पुकारणारे नाभिक समाजाचे राष्ट्रसंत संत शिरोमणी संत सेनाजी महाराज यांचा जन्म मध्यप्रदेश राज्यातील उमरीया जिल्ह्यातील बांधवगड या गावी वैशाख वद्य व्दादशीला रविवार ११९० या दिवशी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव देविदास वैद्य तर आईचे नाव प्रेमकुवरबाई देविदास वैद्य असे होते. त्यांचे वडील हे तत्कालिन मंत्रीमंडळातील एक चाणाक्ष कर्तुत्ववान व प्रभावशाली मंत्री होते.

सेना महाराजांचे कार्य :-

सेना महाराजांनी समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा,कर्मकांड, दैववाद,विरोधात दंड थोपटून बंड पुकारण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. निद्रिस्त समाजाला गदागदा हलवून खडबडून जागे केले.जातीविहरीत व शोषणमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी त्यांनी भारतभ्रमण करुन समाजाचे प्रबोधन करण्याचे कार्य केले.

महाराष्ट्रात त्यांनी अनेक काळ वास्तव्य केले. अल्पावधीतचं त्यांनी मराठी भाषा आत्मसात करुन इतके प्रभुत्व मिळवले की, मराठी भाषेत त्यांनी अनेक उत्कृष्ट अभंगांची निर्मिती केली.

**उदाहरणार्थ,**

**आम्ही वारीक वारीक । करु हजामत बारीक ।।**<br>
**विवेक,दर्पण आयना दावू । वैराग्य चिमटा हालवू ।।**<br>
**उदक शांता डोई घोळू । अहंकाराची शेंडी पिळू ।।**<br>
**भावार्थाच्या बगला झाडू । कामक्रोध नखे काढू ।।**

अशा प्रकारचे अनेक मराठी अभंग महाराजांनी रचले व त्याव्दारे समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यांनी स्वतःला वारकरी चळवळीत झोकून देऊन चार वर्णाच्या गराड्यात अडकलेला हा समाज व त्यांतील जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी त्यांनी अविरत संघर्ष केला.

जाती कुळाने भक्ती श्रेष्ठत्व ठरत नसुन त्यांच्या शुध्द भावावर व कर्मावर ठरते आणि परमेश्वर हा व्यक्तीच्या चांगल्या आचारणात व सत्कर्मात असतो हेच मर्म त्यांनी सांगितले.जातीभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाह व सहभोजन यासारखे उपाय सांगितले.

सेनाजी महाराज हे नुसते शब्दवीरच नव्हते तर कृतीवीर होते.



माणसाला माणुस म्हणून जगता यावे यासाठी त्यांचा महत्वपूर्ण प्रयत्न होता. यासाठी त्यांनी अठरा राज्यात फिरुन वारकरी चळवळ भक्कम करुन अन्याय,अत्याचार, अंधश्रध्दा यावर प्रहार करुन वारकरी ही संकल्पना दृढ केली. ज्यावेळी त्यांच्या राजाला कोड हा आजार झाला होता, त्यावेळी चमत्काराने,नवस सायासाने तो कोड बरा होणार नही तर आयुर्वेदाच्या शास्त्राने, विज्ञानाच्या आधारावर, निसर्गाच्या अभ्यासाने नाहीशे करण्याचा प्रयत्न त्यांनी केला म्हणूनच ते जगातील कुष्ठरोग्यांवरील औषधाचे जनक ठरले.

अशा परिवर्तनवादी, विज्ञानवादी, समाजसुधारकाच्या राष्ट्रसंताच्या विचारांना नष्ट करण्याचा प्रयत्न इथल्या प्रस्थापित व्यवस्थेने केला.

सेनाजी महाराजांचे संदेश- चोरी करु नका, खोटे बोलू नका,व्याभिचार करु नका, मद्यापान करु नका, स्त्री जातीचा सन्मान करा, आई-वडिलांची सेवा करा, कठोर परिश्रम करा. असा आखिल मानवजातीसाठी लोककल्याणकारी असणाऱ्या संदेश त्यांनी माणसाला दिला.

प्रामुख्याने नाभिक समाजाचा अलौपिक व राष्ट्रनिर्माणासाठी पोषख असलेला इतिहास पाहता तथागत बुध्दांच्या सहवासातील भन्ते उपाली पासुन, वारकरी चळवळीचे महानायक संत सेनाजी महाराज, स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराजांवर सय्यद बंडाचा होणारा वार आपल्या अंगावर घेणारे नाभिक समाजभुषण जिवाजी महाले, पन्हाळगडावरुन शिवाजी महाराजांची सुटका होण्यासाठी हूबेहूब महाराजांचे प्रतिरुप धारण करणारे व आपल्या प्राणाची बाजी लावणारे वीर शिवाजी काशिद, स्वातंत्र्यसैनिक विरभाई कोतवार, सांडू सखाराम वाघ, शाहीर लाला वाघमारे, इथपर्यंतचा इतिहास हा मानवी समाजाला उर्जा देणारा असा आहे.

ज्या व्यवस्थेने या समाजाला हीन समजले तोच नाभिक समाज राष्ट्र निर्माणास पोषक असणारी कारकीर्द उभी करुन शकतो ! ही एक चिकित्सक विचार करण्यास भाग पडणारी गोष्ट आहे.

माणसातील माणुसकी नष्ट झालेल्या माणसाला माणुस जोडण्याचे काम सेनाजींनी केले. आपल्या जीवन कार्यात त्यांनी तथागत बुध्दांना, भारतीय स्वातंत्र्याला, सांविधानाला,समतामुलक समाज निर्मितीस अपेक्षित असलेले कार्य त्यांनी केले.

श्रावण कृष्ण व्दादशीला संत सेना महाराज समाधीस्त झाले.

आत्ता या महान संताची विवेकी विचारधारा जर समजुन घेतली तर संताच्या विचारधारेवर आधारित राष्ट्रव्यापी व एक विश्वव्यापी वारकरी चळवळ उभी राहील.



**- प्रा.खंडागळे सोमीनाथ**<br>
**पाटोदा (बीड)**<br>
**(मा.जिल्हाकार्याध्यक्ष- महाराष्ट्र नाभिक महामंडळ बीड/संचालक- ओम कोचिंग क्लासेस पाटोदा)**

# जीवघेण्या डीजेवर कायमस्वरूपी बंदी हवी

सर्वोच्च न्यायालयाने डीजे वाजवण्यावर निर्बंध आणले आहेत, तर मुंबई उच्च न्यायालयाने डीजेवर याआधीच बंदी घातली आहे. ही बंदी कायम ठेवून गणेशोत्सवादरम्यान डीजे अथवा डॉल्बी वाजवलयास मंडळावर कडक कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने नुकतेच दिले आहेत. कौटुंबिक कार्यक्रम असो वा सांस्कृतिक किंवा एखादा सार्वजनिक उत्सव वा महापुरुषांची जयंती आणि पुण्यतिथी अशा ठिकाणी लोकांची गर्दी जमवायची असेल, तर डीजे वाजलाच पाहिजे असे काहीसे समीकरण गेल्या काही वर्षांत तयार होऊ लागले आहे. प्रचंड आवाजामुळे ध्वनी प्रदूषणासह आरोग्याची हानी करणारा डीजे हळूहळू आधुनिक संस्कृतीचा अविभाज्य भाग बनू लागला आहे. पळ;पळ;ल;विकल;मार्च-एप्रिल महिन्यात लगीन सराई जोमाने होती अशा ठिकाणी मित्र परिवाराला खुश करण्यासाठी मद्यपानाच्या मेजवान्यांसह थिरकण्यासाठी वरातीत डीजेची सोय केली गेल्याचे अनेक ठिकाणी पाहायला मिळाले. मुंबईसारख्या ठिकाणी गल्लीबोळांतही डीजे वाजू लागला कि कार्यक्रम कोणाचा आहे हे न पाहता नाचण्यास उत्सुक असणाऱ्या मंडळींचे पाय डीजेच्या आवाजाच्या दिशेने वळताना पाहायला मिळतात. डीजेची व्यवस्था करायची तर खर्चही अधिक येतो, अशावेळी बाकीच्या खर्चाशी तडजोड करून डीजेला प्राधान्य देणारी मंडळीही हल्ली बरीच पाहायला मिळतात. सार्वजनिक उत्सव, महापुरुषांच्या जयंती आणि पुण्यतिथी यानिमित्ताने काढल्या जाणाऱ्या मिरवणुका यांमध्ये डीजे वाजवणे जणू अनिवार्यच झाले आहे. एखाद्या देवतेच्या गाण्याने वाजायला सुरुवात करणारा हा डीजे हळूहळू रंगात येऊन कधी 'मुन्नी बदनाम हुई', 'एक बोतल व्होडका काम मेरा रोज का' यांसारख्या गाण्यांवर सरकतो हे कळतही नाही आणि या मिरवणुकीत चित्रविचित्र अंगविक्षेप करत नाचणारी मंडळीही अशी गाणी वाजू लागली की अधिक जोमाने धिंगाणा घालू लागतात. आपण कोणत्या महापुरुषाच्या मिरवणुकीत नाचतो आहोत, त्यांची शिकवण काय, आपल्याला असे थिरकताना पाहून त्या महापुरुषांच्या आत्म्याला किती वेदना होत असतील याचा तिळमात्र विचार या मंडळींकडून केला जात नाही. गणेशोत्सवाच्या मिरवणुकीत मंगलवाद्यांसह काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीत मोजकीच मंडळी दिसतील मात्र ज्या मिरवणुकीत डीजे वाजवला जातोय अशा ठिकाणी आजूबाजूला हजारोंचा समुदाय पाहायला मिळतो.

डीजेमुळे आरोग्यावर होणाऱ्या भयंकर परिणामांमुळे सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच डीजे वाजवण्यावर बंधने आणली आहेत. मिरवणुकीत डीजे वाजवण्यास स्वतंत्र परवानगी घेणे अनिवार्य करण्यात आले आहे, डीजेच्या आवाजाला ४० डेसिबल्सची मर्यादा घालून देण्यात आली आहे; मात्र ही मर्यादा सर्वत्रच ओलांडली जाते. नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींची दाखल घेत अनेक वेळा या डीजेंवर पोलिसांकडून कारवाईही केली जाते, तरीही डीजे वाजवणाऱ्यांचे प्रमाण काही कमी झालेले नाही. नुकत्याच पार पडलेल्या दहीकाला उत्सवाच्या निमित्ताने मुंबई, ठाणे आणि पुणेसह अनेक शहरांत लाखोंची बक्षिसे मिळवून देणाऱ्या दहीहंड्या बांधण्यात आल्या होत्या त्यापैकी जवळपास ९० टक्के हंड्या या राजकीय मंडळींनी पुरस्कृत केलेल्या होत्या. यातील बहुतांश हंड्यांमध्ये चढ्या आवाजात डीजे वाजत होते.

◆ पान ९ वरून पुढे...

## जिल्ह्यात सुरू...

उपाययोजना कराव्यात अशी मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली. गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण राज्यभरात संततधार पाऊस सुरू आहे. बीड जिल्ह्यातही मागील काही दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे. अतिवृष्टीमुळे बीड मतदारसंघासह संपूर्ण जिल्ह्यात पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सोबत पशुधनाचेही नूकसान झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी गावांना जोडणारे अनेक पूल वाहून गेले आहेत. याबाबत प्रशासकीय स्तरावरून उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच शेतकरी बांधवांच्या झालेल्या नुकसानींचे तातडीने पंचनामे करावेत अशी मागणी यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली.

तेलगाव नाका अपघातासंदर्भातही घेतली संबंधित संयुक्त विभागांची बैठक: शनिवारी (दि.१९) रोजी बीड नगर परिषदेचे कर्मचारी शेख बाबू यांचा अपघाती मृत्यू झाला होता. बीड शहरातील तेलगाव रोडवर जलजीवन पाणीपुरवठा योजना आणि रस्त्याचे काम सुरू आहे. या रस्त्यावर एका बाजूनेच वाहतूक सुरू आहे. त्यामुळे याठिकाणी अपघात होत आहेत. काही दिवसांपूर्वीच एका तरूणाचाही या रस्त्यावर अपघाती मृत्यू झाला होता. आणि आता एका जेष्ठ नागरिकाचा बळी गेला आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

त्याअनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरण व नगरपरिषद यांची संयुक्त बैठक घेऊन पुन्हा एखाद्या नागरिकाचा नाहक बळी जाणार नाही यासाठी उपाययोजना करा. असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## बीडमधील शेतकरी...

यानंतर मुख्यमंत्री आणि कृषीमंत्री यांना निवेदन पाठवून पंचनामे करणे व मदतीची मागणी केली होती. आज दि.१९ रोजी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून केंद्र सरकारच्या वतीने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी केली. दरम्यान, गेल्या ४/५ दिवसांपासून झालेल्या संततधार पावसामुळे बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्रच शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उपजाऊ मातीसह जमीन वाहून गेल्यामुळे पुढील काळासाठी काही क्षेत्र उजाड झाली आहेत. काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे तसेच गुरे दगावले असल्याची माहिती येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. झालेल्या नुकसानीचे फोटो व व्हिडिओ स्वत:कडे जतन करून ठेवावेत, तसेच नुकसानीबाबतची तक्रार फोटो, व्हीडिओसह तहसीलदार यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर करावी. या प्रक्रियेत कुठलीही अडचण

◆ पान ९ वरून पुढे...

आल्यास माझ्या कार्यालयाशी संपर्क साधून मदत घ्यावी, असे अवाहनही खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील शेतकरी व नागरिक यांना केले आहे.

## दीड वर्षापासून..

मागणी लावून धरत तेथील संचालक मंडळ अस्तित्वात येऊ दिले नाही. मात्र या ठिकाणी नेमलेले प्रशासकीय अधिकारी देखील कमकुवत ठरत असल्याचे दिसत आहे. जिल्हा बँकेच्या प्रशासकीय मंडळाला त्या बँकेच्या आवारात गेल्या दीड वर्षापासून बेकायदेशीर रीतीने मुक्काम ठोकणाऱ्या तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांना रोखता येत नाही, ही बाब शरमेची आहे. दरम्यान, याबाबत ॲड. देशमुख यांनी महाराष्ट्र शासन, सहकार आयुक्त पुणे, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर, जिल्हाधिकारी बीड, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड, तालुका उपनिबंधक सहकारी संस्था बीड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा बँक, बीड यांच्यासह इतरांना निवेदन दिले आहे. एकीकडे दीड वर्षापासून शासनाकडून घर भाडे भत्ता घेणे आणि दीड वर्ष चंबुगबाळ जिल्हा बँकेत ठेवून तेथे राहणे, ही क्लास वन अधिकाऱ्याची असलेली भूमिका शासनाची फसवणूक करणारी असल्यामुळे त्यांच्यावर आणि जिल्हा

◆ पान ९ वरून पुढे...

बँकेतील अधिकारी कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा नोंदवायची मागणी देखील करण्यात आली आहे. शासन आणि प्रशासकीय मंडळ, जिल्हा बँक यांना दिलेल्या निवेदनात या अधिकाऱ्यांच्या वेतनातून दिलेला घर भाडे भत्ता व्याजासह वसूल करावा. आपण करत असलेल्या कार्यवाहीची माहिती तात्काळ आम्हास द्यावी अन्यथा आम्हाला आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल, असा इशारा देखील देशमुख यांनी दिला आहे.

## सार्वजनिक ठिकाणी...

सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करताना मिळून आले. पथकाने त्यांना ताब्यात घेवून त्यांना बीड शहर पोस्टे ला नेवून विचारपुस केली असता, त्यात काही अल्पवयीन मुलांचा समावेश होता. म्हणून त्यांच्या आई-वडिलांना पोस्टेला बोलावून घेतले व सर्व हकीकत सांगितली. अल्पवयीन मुलांना समज देऊन पालकांच्या ताब्यात दिले. व इतर नऊ मुलांवर मुंबई पोलीस अधिनियम अन्वये कारवाई केली. तरी आपापल्या मुलांवर पालकांनी लक्ष द्यावे व तो व्यसनाधीन होणार याची काळजी घ्यावी. सदर कारवाई पीएसआय पल्लवी जाधव, सहायक फौजदार मीरा रेडेकर , पोलीस हवालदार शोभा जाधव व पोलीस शिपाई गजानन चौधरी सर्व नेमणूक दामिनी पथक बीड यांनी केली.

◆ पान ४ वरून पुढे...

## आधार मल्टीस्टेटने...

करून स्वतःचा आणि आपल्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करणाऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम करते आहे. आधार मल्टीस्टेट ही केवळ व्यवसाय नाही. तर सामाजिक भान राखून काम करणारी संस्था आहे. दरवर्षी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, अर्थ, उद्योग, सहकार, कला, साहित्य, क्रीडा क्षेत्रात ज्यांचे चांगले काम आहे अशांचा सन्मान करून त्यांचा आत्मविश्वास वाढविण्याचे काम करते आहे. असाच अनोखा कार्यक्रम शनिवार, दि.१६ ऑगस्ट रोजी आधार मल्टीस्टेटच्या 'अजिंठा हॉल' या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. सुप्रसिद्ध महागायक सुभाष शेप यांनी सांगितिक क्षेत्रात २५ वर्षे सातत्याने अखंडितपणे सेवा देण्याचे काम केले त्याबद्दल त्यांना आधार मल्टीस्टेटच्या वतीने 'जीवनगौरव पुरस्कार व कृतज्ञता सोहळा' आयोजित केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर हे होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण होते पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने, या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार व साप्ताहिक सांजपाखरूचे संपादक अशोकराव गुंजाळ, जगविख्यात पखवाज वादक उद्धवराव बापू आपेगावकर यांच्यासह आधार मल्टीस्टेटचे चेअरमन ॲड.सुनील सौंदरमल, संचालक तथा सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे व सेवानिवृत्त प्रा.दादाराव धाकडे, ज्योतीराम (अण्णा) शेप आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व त्यानंतर मान्यवरांनी दीपप्रज्ज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आधार मल्टीस्टेटचे चेअरमन ॲड.सुनील सौंदरमल यांनी करताना संस्थेच्या वार्षिक कार्याचा आढावा घेतला. ही संस्था म्हणजे सामाजिक जाणिवा लक्षात घेऊन काम करणारी संस्था असल्याचे सांगत १०० कोटी रूपयांच्या ठेवी जमा करण्यात यश आल्याचे सांगितले व येणाऱ्या काळात सर्व संचालक व सर्व ग्राहक सभासदांचा विश्वास संपादन करीत मोठी भरारी घेण्याचा संकल्प ॲड.सुनील सौंदरमल यांनी बोलून दाखवला. प्रास्ताविकानंतर महागायक सुभाष शेप यांना आधार मल्टीस्टेट कडून दिला जाणारा 'जीवनगौरव पुरस्कार' पद्मश्री व जगविख्यात नेत्रतज्ञ डॉ.तात्याराव लहाने व मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप हे सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ आणि सुभाष शेप यांना भर पेहराव तर त्यांच्या अर्धांगिनी सौ.सुनिताताई यांना साडी, चोळी असे होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार मल्टीस्टेटचे वरिष्ठ अधिकारी अशोक डोंगरे यांनी केले. या कार्यक्रमाच्या

◆ पान ४ वरून पुढे...

यशस्वितेसाठी आधार मल्टीस्टेटचे सर्व संचालक मंडळ, अधिकारी वर्ग ,कर्मचारी, पिग्मी प्रतिनिधी यांचे प्रयत्न महत्त्वाचे राहिले. या कार्यक्रमासाठी ओमकेश दहिफळे, एस.बी.सय्यद, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.ज्ञानोबा दराडे, प्रा.पंडित कराड, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.अशोक पत्की, अभिजीत जोंधळे, डॉ.अभिमन्यू तरकसे, डॉ.बाबुराव फड, नारायण मुंडे, प्रा.शंकर वाघमारे, भाजपाचे अंबाजोगाई शहराध्यक्ष संजय गंभीरे, ॲड.अनिल लोमटे, जनाबाई राख, शेख रफिक, मयुरी मजगे, शेप यांचे जावाई दंतरोग तज्ज्ञ डॉ. ऋषिकेश घुले यांच्यासह वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आधार मल्टीस्टेटच्या वतीने या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल उपस्थितांकडून त्याचे स्वागत करण्यात आले.

## धुनकेश्वर हे...

असे धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव धुनकवाड येथे चौथा श्रावण सोमवार आयोजित कीर्तन सोहळ्यात बोलताना शिवचरित्रकार ह.भ.प.केशव महाराज पवार यांनी भाविक-भक्तांना एकात्मतेचा संदेश दिला. यावेळी केशव महाराज पवार यांना चौथ्या श्रावण सोमवारच्या महाप्रसादाचे यजमान यांच्या वतीने ग्रामदैवत धुनकेश्वराची प्रतिमा,फेटा,पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.गेल्या दहा वर्षांपासून धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव आयोजित केला जात आहे.यावर्षीही श्रावण महिन्यातील चार सोमवारी नामांकित किर्तनकारांचे किर्तन झाले यामध्ये पहिला श्रावण सोमवार ह.भ.प.श्रीराम महाराज शेळके,दुसरा श्रावण सोमवार ह.भ.प.राजेंद्र महाराज वाघमारे,तिसरा श्रावण सोमवार ह.भ.प. वैराग्यमुर्ती रामकृष्ण बापु रंधवे तर चौथा सोमवार ह.भ.प.केशव महाराज पवार यांच्या सुश्राव्य वाणीतून किर्तन सेवा झाली व महाप्रसाद झाला. पुढे बोलताना केशव महाराज म्हणाले की, डोंगरपट्ट्यातील तेरा प्राचीन शिवलिंगांपैकी धुनकेश्वर हे एक महत्त्वाचे स्थान असून या पवित्र स्थळी धुनकेश्वर क्षेत्राचे धार्मिक महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, डोंगरपट्ट्यात तेरा प्राचीन शिवलिंगांची परंपरा आहे. यापैकी धुनकेश्वर हे एक प्राचीन आणि ऐतिहासिक शिवलिंग असून तेरा शिवलिंगांमध्ये धुनकेश्वरला विशेष मान आहे.येथे श्रावण महिन्यात भाविकांची विशेष गर्दी असते.जो अमृत पचवतो तो देव परंतु जो वीष पोचवतो तो महादेव,निळकंठेश्वर हे होय.जिवनात परमार्थ करत असताना निष्ठेने व प्रमाणीक करा असेही शेवटी सांगितले. कीर्तनस्थळी पंचक्रोशीतील भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराजांचे कीर्तन श्रवण केले व महाप्रसादाचे ही आयोजन करण्यात आले होते. यावेळी वातावरण भक्तिमय झालं होतं. हजारो भाविकांनी धुनकेश्वराचे दर्शन घेतले असुन हर-हर महादेव,धुनकेश्वर महाराज की जय या जय

◆ पान ४ वरून पुढे...

घोषाणे परिसर दणाणून गेला होता.

## 'खुशी' च्या...

आपल्या आयुष्यातील अंधारमय जगातही प्रकाशाची ज्ञानज्योत कशी उजळावी, प्रत्येक मुलाने आत्म विश्वासाने समाजात वाटचाल करावी, या भावनेतून यापूर्वी या संस्थे च्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात आले होते, त्यावेळीही सर्वच्या सर्व ४७ विद्यार्थ्यांना मिळाल्याने त्यांचं हा आनंद गगनात मावेनाशा झाला होता.या संस्थेचे अध्यक्ष बबलू टेकाळे यांनी सांगितले की, लहान मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहिला की माझे मन भारावून जाते. त्यांच्या चेहऱ्यावरची खुशी हीच माझी खरी संपत्ती आहे. मी दिलेला शब्द पाळणार असून येत्या दसऱ्याला विद्यालयासाठी संगणक उपलब्ध करून विद्यार्थ्यांना एकसारखा गणवेश देणार आहे. विद्यार्थ्यांच्या उज्वलभविष्याचा गाजावाजा न करता, अगदी मनापासून सेवा करण्याची गरज असते, याचे उदाहरण या उपक्रमातून दिसून आले. विद्यार्थ्यांच्या निरागस चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि मिळालेल्या गणवेशाची खुशी, हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले. शहरातील 'खुशी सेवा भावी संस्थे ' च्या वतीने असे अनेक सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक उपक्रम म्हणजे समस्त देगलूरवाशियांसाठी अभिमानाची बाब आहे. या सर्व सामाजिक कार्याचे शहरातील लहान थोरामध्ये चर्चा सुरु आहे.

## श्री सोमेश्वर....

होत्या या ठिकाणी श्री सोमेश्वर मंदिर व श्री महारुद्र फाउंडेशन विश्वस्त यांच्या वतीने अतिशय चौक व्यवस्था या ठिकाणी बाबत भक्तांसाठी करण्यात आली आहे येथे येणाऱ्या बीड जिल्ह्यातील तमाम सर्व भाविक भक्तांचे आभार देखील या मंदिराचे विश्वस्त तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील हे मानत आहेत व आपण भविष्यातही आपण देव देश आणि धर्म या साठी सातत्याने या मंदिरामध्ये धार्मिक कार्यक्रम घेत राहु असे आश्वासन देखील सर्व भाविक भक्तांना या ठिकाणी मंदिर विश्वस्तांच्या वतीने देण्यात आले हो कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही यासाठी पोलीस बंदोबस्त देखील त्या ठिकाणी मंदिराच्या वतीने ठेवण्यात आला होता व श्रावण महिन्यातील हा शेवटचा चौथा सोमवार अतिशय मोठ्या धुमधडाक्यात उत्साहाच्या वातावरणामध्ये श्री महादेवाचे यथाशक्ती यथा भक्ती पूजन करून दर्शन घेऊन त्या ठिकाणी अनेक भक्ताने फराळ केला व सोमवार या महान व्रताचा या ठिकाणी बसवून जप ओम नमः शिवाय या महामंत्राचा जप करून एक आगळावेगळा परमानंद या भाविक भक्तांना या सोमेश्वर मंदिर परिसरामध्ये

◆ पान ४ वरून पुढे...

श्री भगवान महादेवाच्या सानिध्यामध्ये बसून आला असे सर्व भाविक भक्तांच्या चेहऱ्यावर आज या मंदिर परिसरामध्ये मोठा आनंद दिसून आला.

## बीडचा फुटबॉलपटू ...

फुटबॉलप्रती असलेल्या आवडीची कहाणी आहे. एनआयएस प्रमाणित फुटबॉल प्रशिक्षक श्री. एस.पी. खान यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतलेला अब्दुल हक, मिलान बॉईज ज्युनिअर संघासाठी सातत्याने उत्तम खेळ करत आला आहे. अलीकडेच त्याने मुंबई येथे व्यावसायिक क्लबविरुद्ध सामने खेळून आपल्या कौशल्याची झलक दाखवली असून, तो बीड शहरातील फुटबॉलमधील एक नवोदित तारा ठरत आहे. या यशाचा आनंद साजरा करण्यासाठी मिलान बॉईज फुटबॉल क्लबचे प्रमुख श्री. मुजीब इनामदार आणि प्रशिक्षक श्री. एस.पी. खान यांनी अब्दुल हक यांचा सत्कार करून त्याला उज्वल यशासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी व्यक्त केले की अशा कामगिरीमुळे वैयक्तिक खेळाडूच नव्हे तर बीडमधील फुटबॉलची पातळीही उंचावते. अब्दुल हकच्या या प्रवासात मिलान बॉईज क्लबमधील व्यावसायिक खेळाडू श्री. सय्यद जफर, श्री. शुएब, श्री. वैभव, श्री. अबूबकर, राहुल बयास आणि श्री. आमेर खादरी यांनी त्याला मार्गदर्शन करून प्रेरणा दिली. मिलान बॉईज फुटबॉल क्लब व ट्रेनिंग सेंटर, बीड यांच्या वतीने अब्दुल हकचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून, त्याच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## सोयाबीन पाण्याखाली...

तरी ते प्रत्यक्षात होत नसल्याचे दिसून येते. शेतकरी आर्थिक संकटात सापडले असल्याने शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

## चेक बाउन्स...

दोन वर्ष अकरा महीने चालले. एडवोकेट तेजस नेहरकर यांनी फिर्यादीचे बाजूने कायद्याच्या चौकटी प्रमाणे पुराव्याची केलेली मुद्देसूद मांडणी व सर्व टेक्निकल पुरावे मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणले व त्या पुराव्यावरून माननीय मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांनी मूळ रक्कम तीन लाख रुपये व त्यावर दंड चार लाख रुपये असे एकूण सात लाख रुपयेआरोपीने फिर्यादीस देण्याचे आदेश केले आहेत. तसेच आरोपीला सहा महिन्याची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या प्रकरणात फिर्यादी तर्फे ॲड. तेजस नेहरकर यांनी काम पाहिले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# ऑरेंज व यलो अलर्टच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी व प्रशासनाने सतर्क राहण्याचे विभागीय आयुक्तांचे आवाहन

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

भारतीय हवामान विभाग, मुंबई यांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार आज दिनांक १८ ऑगस्ट, २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड व लातूर जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट तर परभणी, हिंगोली, नांदेड आणि धाराशिव जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी धाराशिव वगळता सर्व जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला असल्याने नागरिकांनी व प्रशासनाने सतर्क रहावे, असे



आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय यांनी आज व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे पूर परिस्थितीचा आढावा घेतला व झालेल्या नुकसानीचे योग्य प्रकारे पंचनामे करून शासनास अहवाल सादर करावा, पर्यटन स्थळे, धबधबे व गर्दीची ठिकाणे येथे स्थानिक पोलीस प्रशासनाकडून नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करावी व आवश्यक ती काळजी घेण्यात यावी, जिल्हाधिकारी यांनी स्थानिक संभाव्य पूर परिस्थितीचा विचार करून जिल्ह्यातील सर्व शासकीय तसेच खाजगी शाळांना सुट्टी संदर्भातील निर्णय घ्यावा, स्थलांतरित नागरिकांच्या निवारा केंद्रांमध्ये योग्य सोयी-सुविधा, अन्न व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. नागरिकांनी नदी, नाले, बंधारे, धरण परिसरात जाणे टाळावे व प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, तसेच अफवांवर विश्वास न ठेवता फक्त अधिकृत स्त्रोतांवरूनच माहिती घ्यावी असे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

छत्रपती संभाजीनगर विभागात रोजी ३२.३० मि.मी. पर्जन्यमानाची नोंद झाली असून, विभागातील ५७ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली आहे.तसेच दि.१४.०८.२०२५ पुन १८.०८.२०२५ अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत जिल्ह्यांकडून प्राप्त प्राथमिक माहिती नुसार विभागातील एकूण १००४ गावे बाधित झालेली असून ०१ व्यक्ती जखमी तर ०६ व्यक्ती मयत (हिंगोली-०१,नांदेड-०३,बीड-०२) झालेल्या आहे.तर एकूण २०५ जनावरे मयत(दुधाळ मोठी-६९,दुधाळ लहान-१०२,ओढकाम करणारी मोठी-२८, ओढकाम करणारी लहान-०६) झालेली आहे.तर अंशतः पडझड झालेल्या घरांची संख्या एकूण - ४८६ आहे.शेती पिक नुकसानीच्या प्राथमिक माहिती अहवालानुसार एकूण ३,२९,५०९ शेतकरी बाधित झाले असून २,८०,८६१.०२ हे.आर क्षेत्राचे (जिरायत-२७२५०७.०२,बागायत-८१५८,फळपिक-१९६ हे.आर) नुकसान झाले आहे.

# स्वातंत्र्य दिनी पालकमंत्री अजित पवारांने उपोषणकर्त्यांचा केला स्मरणीय गेम

**बीड जिल्हाधिकारी प्रतीक्षा कक्षात बसवून ठेवले, उभाट्याने आले बाय, बाय,टाटा करून निघून गेले**

बीड । प्रतिनिधी

७९ व्या स्वातंत्रय दिवसी उपोषणकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयासमोर समस्या अडीअडचणी संबंधी किमान ४० उपोषणकर्ते उपोषणात सामील होते, स्वतंत्र दिवसी अथवा ज्या उत्सवी भारतीय इ ोड मंत्री प्रतिष्ठीत व्यक्ती राष्ट्रीय झेंडा फडकवण्यास प्रमुख अतिथी असतात. झेंडा फडकवल्यानंतर समस्याग्रस्त व्यक्ती, नागरीकांच्या भेटी घेवून त्यांना प्रशासन, शासन स्तरावर मदत करतात. पालकमंत्री या नात्याने मंत्री महोदय, हे कर्तव्य समजून भेट देतात. परंतू बीड जिल्ह्याला



पालक मंत्री म्हणून अजित पवार यांनी पालकत्व स्विकारले असता ते उपोषणकर्त्याची दखल घेत नाहीत, मागच्या वर्षी ही यांनी उपोषणकत्यांची भेट घेतली नव्हती. यावर जनतेत उपोषणकर्त्यात रोष होता व मिडीयाद्वारे नाराजी व्यक्त केली होती.

सन २०२५ च्या स्वतंत्र दिनी पालकमंत्री म्हणून अजित पवार बीड येथे येत असल्यामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांनी व पोलीस प्रशासनांने पवार साहेबांची भेट देतो, म्हणून उपोषणकर्त्यांचे अर्ज घेतले. कलम १४४ ची नोटीसाही दिल्या व १५ ऑगस्ट या दिवशी ११ वाजता जिल्हाधिकारी प्रतिक्षा कार्यालयात उपोषणकर्त्यांना डांबून ठेवले, अजित पवार उभाट्यानेच चालत प्रतिक्षा कक्षात आले व त्यांनी अर्ज स्विकारण्याचे ढोंग केले, हुंड्याचा नवरदेव फेटा बांधून सासरी मंडळीला जसा राम राम करतो. मनधरणी करण्याचे मनसुबे प्रगट करतो, त्याप्रमाणे सर्व काही घडले अजीत पवार यांनी उपोषणकर्त्यांस मनमोकळे संवाद केला नाही. त्यांच्या समस्या सोडवल्या नाहीत. देखावा करून निघून गेले, अजीत पवारांचे कार्यकर्ते व पोलीस यांनी उपोषणकर्त्यांची फसवणूक केली जिल्हाधिकारी, आरामशरी हे सर्व पाहात आहेत. उपोषणकर्ते आता या क्षणी जिल्हाधिकारी कर्यालयासमोर बसून आहेत. त्यांच्याकडे येथील प्रशासन व्यवस्था कसलेच सहकार्य करत नाही, ही शोकांतीका आहे, अशी प्रतिक्रीया माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी दिली.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांचे सरसकट तात्काळ पंचनामे करून हेक्टरी एक लाख रुपयांची मदत द्यावी : अशोक डक

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या तीन-चार दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या अतिवृष्टीमुळे केवळ शेतीच नव्हे तर रस्ते, नदी-नाल्यालगतची जमीनही मोठ्या प्रमाणावर वाहून गेली आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांनी शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत द्यावी अशी मागणी केली आहे. १३ ऑगस्टपासून सलग



पडणाऱ्या पावसामुळे तालुक्यासह जिल्ह्यातील १७ महसुलमंडळात अतिवृष्टी झाली. परिणामी शेतकऱ्यांच्या हातात आलेले सोयाबीन, कापूस, तूर, बाजरी ही पिके पाण्याखाली गेली असून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. नदी-नाल्यालगत असणाऱ्या शेतजमिनी खरडून गेल्या आहेत.

याशिवाय गावांना शहराशी जोडणारे रस्ते तसेच शेतात जाणारे पायवाटेचे रस्ते वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे हाल झाले आहेत. त्यामुळे शासनाने तातडीने या रस्त्यांची दुरुस्ती करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, तसेच अतिवृष्टीग्रस्त सर्व शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करून हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी अशी मागणी अशोक डक यांनी केली आहे.

## दत्त संस्थान बालाघाट येथे प्रवचन

बीड । प्रतिनिधी



सर्व भाविक भक्तांना कळविण्यात अतिआनंद होतो की गुरुवार दि.२१ ऑगस्ट २०२५ रोजी शिवानंद शिवाचार्य मठ संस्थान तमलूरचे मठाधीश श्री ष.ब्र.१०८ तपोरत्न सदगुरू शिवानंद शिवाचार्य महास्वामिजी यांचे जीवनात गुरूचे स्थान या विषयावर सविस्तर प्रवचनाचे आयोजित केले आहे. श्री ष.ब्र.१०८ तपोरत्न सदगुरू शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर यांचे श्री क्षेत्र कपिलधार येथे ४१ व्या अनुष्ठानाची सांगता बुधवार दि.२० ऑगस्ट रोजी झाली आहे. या श्रावण महिन्याच्या पावन पर्व काळानिमित्त गुरुवार दि.२१ ऑगस्ट २०२५ रोजी आहे.

## हर घर तिरंगा अभियानांतर्गत व्ही.जी. आवाड यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये ध्वजारोहण

बीड । प्रतिनिधी

बीड येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी हर घर तिरंगा अभियानांतर्गत भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त या विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक व्ही.जी. आवाड यांच्या शुभहस्ते आणि या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ध्वजारोहण कार्यक्रम उत्साह मध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रारंभी महात्मा गांधी आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांची प्रभात फेरी शालेय परिसरातून काढण्यात आली. याप्रसंगी पसायदान चे सामूहिक गायन करण्यात आले. विद्यार्थ्यांची सामूहिक कवायत आणि डंबेल्स कवायत या विद्यालयाचे शिक्षक यु.बी. पवळ यांच्या मार्गदर्शनाखाली नयन मनोहर संपन्न झाली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्तीपर गीताचे गायन केले.

या कार्यक्रमाचे संचालन सांस्कृतिक व प्रमुख विजय देशमुख, प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि



आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस. वाघमारे यांनी केले. याप्रसंगी आनंद छात्रालयाचे अध्यक्ष डी.व्ही. खरसाडे, या विद्यालयाचे शिक्षक आर.बी घुले, श्रीमती एन.जी. मुंडे, शिक्षकेतर कर्मचारी एल.बी. हजारे, भारत कोळेकर आणि एस.एस. गायकवाड, बहुसंख्य विद्यार्थी, पालक, नागरिक उपस्थित होते.

# वंचित बहुजन आघाडीची निपाणी टाकळी येथे भव्य शाखा उद्घाटन सोहळा संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

तालुका वंचित बहुजन आघाडीची निपाणी टाकळी येथे भव्य शाखा उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न झाला.या सोहळ्याचे उद्घाटन वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा अध्यक्ष (पश्चिम) अजय सरवदे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान तालुका अध्यक्ष अशोक पोळ यांनी भूषविले.

या सोहळ्याचे प्रमुख आयोजक समाधान गायकवाड (तालुका महासचिव) व महादेव पोळ (गंगामसला सर्कल अध्यक्ष)



होते. या वेळी जिल्ह्यातील अनेक मान्यवर कार्यकर्त्यांची भव्य उपस्थिती लाभली.

प्रमुख उपस्थित मान्यवरांमध्ये - ज्ञानेश्वर कवठेकर जिल्हा उपाध्यक्ष, भारत तांगडे, जिल्हा उपाध्यक्ष, सचिन मेघडंबर जिल्हा उपाध्यक्ष, अंकुश जाधव जिल्हा कोषाध्यक्ष, धम्मानंद साळवे जिल्हा सल्लागार, सुदेश पोतदार तालुका निरीक्षक, लखन जोगदंड बीड शहर अध्यक्ष, सचिन उजगरे जिल्हा उपाध्यक्ष पूर्व, शत्रुघ्न कसबे युवक जिल्हा प्रसिद्धी प्रमुख शाखा कार्यकारिणीची निवड खालीलप्रमाणे करण्यात आली: दिपक फंदे (शाखा अध्यक्ष), राजेश पौळ (शाखा उपाध्यक्ष), विशाल पौळ (शाखा उपाध्यक्ष), नितिन पौळ (शाखा सचिव), सुनिल पौळ (शाखा सहसचिव), शिवा पौळ (संघटक), विकास पौळ (कोषाध्यक्ष), तेजेस पौळ (कार्याध्यक्ष), विक्की पौळ (सल्लागार), सुरज फंदे (सदस्य), विजय पौळ,सचिन फंदे, लखन पौळ, देविदास पौळ, साहिल पौळ, सतिष पौळ, अजय पौळ, अनिल पौळ, या कार्यक्रमाला गावातील कार्यकर्ते व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# सौंदाना येथील जि.प. शाळेचे नवीन मंजूर बांधकाम येत्या सात दिवसात सुरु न केल्यास सी.ओ. च्या दालनात शाळा भरवणार : गणेश वरेकर

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील सौंदाना येथील जि.प. शाळेची अवस्था अत्यंत दयनीय झालेली आहे, सर्वत्र पडझड झालेली असुन, पावसाळ्यात हया खोल्या गळत असुन विध्यार्थ्यांनच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करून दोन खोल्या दोन वर्षांपूर्वीच मंजूर करून घेतल्या म



ात्र संबंधित ठेकेदाराने कामच चालू न केल्यामुळे शाळेची अवस्था जास्तच खराब झाली आहे आज सौंदाना येथील रहिवासी व शिवसेना जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके व गावकरी यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांची जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात येऊन भेट घेतली असता सर्व गावकऱ्यांना सोबत घेऊन जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांची भेट घेऊन निवेदन दिले व येत्या सात दिवसांत काम चालू न केल्यास आपल्या दालनात शाळा भरविण्यात येईल असा इशारा जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी दिला आहे. यावेळी जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, उपतालुकाप्रमुख महादेव परसकर, बाबु कुटे, रत्नाकर येवले, विशाल गायके , सुरेश सावंत, सतिश गायके , गोकुळ गायके यांच्यासह सौंदाना येथील गावकरी व शिवसैनिक उपस्थित होते.

## हरवलेल्या व्यक्तीबाबत निवेदन

बीड । प्रतिनिधी

पोलीस ठाणे आष्टी, पो-१८००/२०२४ कलम १३७ (२) भा.न्या.स. प्रमाणे दाखल झालेल्या गुन्हयातील पिडीत अल्पवयीन मुलगी साक्षी सचिन आजबे वय १६ वर्षे ३ महिने रा. शिराळ,ता. आष्टी, जि. बीड दि. २४/०८/२०२४ रोजी सकाळी ०७.०० वा सुमारास तिचे शिराळ फाटा येथून संदीप केशव आजबे, रा. शिराळ ता. आष्टी, जि. बीड हीस अज्ञात कारणासाठी घेऊन गेला आहे. सदर मुलीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे. नाव साक्षी सचिन आजबे, वय १६ वर्षे ३ महिने रा. शिराळ,ता. आष्टी, जि. बीड रंग सावळा,उंची अंदाजे ५.५ फुट, अंगावरील ड्रेस कॉफी रंगाचा कुडता, पांढ-या रंगाची पॅन्ट, केस काळे लांब,डोळे, काळे, नाक सरळ, कान सरळ व कानात सोन्याच्या बाळया, उजव्या हाताच्या तळव्यावर पाठीमागील बाजूस लाहणपणी चहा पोळलेला गोलाकार पांढरा चट्टा रुपयाच्या नाण्याच्या आकारापेक्षा मोठया आकाराचा, अंगाने सडपातळ वर्णनाची आहे. वरील वर्णनाच्या मुलीची माहिती मिळाल्यास किंवा आढळून आल्यास पोलीस ठाणे आष्टी यांच्याशी संपर्क साधावा असे पोलीस ठाण्याचे पोलीस हेड कॉन्सीटेबल ब.न.१८०० भाऊसाहेब आसाराम आहेर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. कोणास सदर मुलगी दिसल्यास कृपया त्वरित संपर्क साधावा: पोलीस ठाणे आष्टी: ०२४४१-२८२५३३ पोह/१८०० आहेर: ९०७५९४५५५५ पोनि श्री. भुतेकर: ९८५१५११३३३.

# प्रशांत थोरात प्रकरण : तहसीलदार - नायब तहसीलदार संघटनेचे मुख्यमंत्री व महसूल मंत्र्यांना निवेदन

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन सादर

बीड । प्रतिनिधी

तहसीलदार श्री. प्रशांत थोरात यांच्यावर झालेल्या एकतर्फी निलंबनाच्या कारवाईच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य तहसीलदार आणि नायब तहसीलदार संघटनेच्या वतीने आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन सादर करण्यात आले . हे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाने देण्यात आले असून त्यात महसूल विभागाशी संबंधित अनेक मुद्दे अधोरेखित करण्यात आले आहेत . संघटनेने निवेदनातून नमूद केले की , प्रशांत थोरात यांच्यावर कोणतीही सखोल चौकशी न करता आणि आपले म्हणणे मांडण्याची संधी न देता एकतर्फी निलंबन करण्यात आले आहे . ही कारवाई न्यायाच्या तत्त्वांना धरून नसल्याचे सांगून तिचा तीव्र निषेध करण्यात आला . या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून वस्तुस्थिती उघड करावी आणि थोरात यांना न्याय मिळवून द्यावा , अशी मागणी संघटनेने केली आहे . निरोप समारंभ कार्यक्रमात



गाणे म्हटले या कारणास्तव नुकतेच उमरीचे तहसीलदार प्रशांत थोरात यांना निलंबित करण्यात आले आहे . संघटनेने पुढे स्पष्ट केले की तहसीलदार हे शासनाच्या कामकाजातील सर्वात महत्वाचे घटक असून त्यांच्या जबाबदाऱ्या व्यापक आहेत . महसूल विभागाचे नियंत्रण ठेवणे , नैसर्गिक आपत्तीच्या काळात तातडीने मदत करणे , टंचाईच्या काळात पाणीपुरवठ्याची देखरेख करणे , गावठाण वाढीची प्रकरणे तयार करणे , रोजगार हमी योजनांची तपासणी करणे , सरकारी जमिनीवरील अतिक्रमण दूर करणे , खाणी व खनिजे यावरील शासनाचे हक्क जपणे , पाणी परवाना देणे , महसूल वसूली करणे , जमीनवाटप , कूळ हक्क ठरविणे , पिक पाहणी करणे , शेतकरी-खातेदारांच्या तक्रारींचे निवारण करणे , तसेच तालुक्यातील सर्व सरकारी विभागांमध्ये समन्वय राखणे अशी अनेक महत्त्वाची कार्ये तहसीलदारांकडे असतात .

याशिवाय संजय गांधी योजना , लाडकी बहीण योजना, महाराजस्व अभियान , महसूल सप्ताह , शेतकरी आत्महत्या प्रस्ताव , जन्म-मृत्यू आदेश , विविध प्रमाणपत्रे , सेतू केंद्र , स्वस्त धान्य दुकाने , गोडाऊन तपासणी , परीक्षा नियोजन अशा शेकडो कामकाजाची जबाबदारी तहसीलदारांकडे असते . त्यामुळे कामाचा व्याप प्रचंड असून , अनावधानाने एखादी किरकोळ चूक घडली तर त्या संदर्भात अधिकाऱ्यांना मोठी व कठोर शिक्षा देणे योग्य ठरत नाही , असा निवेदनाचा रोख आहे. या प्रसंगी बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे , उपजिल्हाधिकारी सतीश धुमाळ , तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी , तहसीलदार तेजस्विनी जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके , तहसीलदार डी. सी. मेंडके , नायब तहसीलदार धनंजय काळे , आर. आर. बोठे , सुधाकर टाक व श्रीमती एन. एन. उगलमुगले हे उपस्थित होते. संघटनेने शासनाला आवाहन केले की , महसूल विभागातील अधिकाऱ्यांना न्याय्य व सुरक्षित कार्यपरिसर उपलब्ध करून द्यावा . प्रशांत थोरात यांच्या प्रकरणाची चौकशी करून त्यांना न्याय मिळवून दिला नाही , तर राज्यभरातील महसूल अधिकाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होईल , अशी स्पष्ट भूमिका संघटनेने मांडली आहे . राज्य संघटनेचे कार्याध्यक्ष सुरेश बगळे , कोषाध्यक्ष राहुल मुंडके , सहसचिव बाळासाहेब वाकचौरे तसेच उपाध्यक्ष आर जे पाटील , डी एस कुंभार , पंकज पवार , प्रवीण ठाकरे , किरण आंबेकर , सहसचिव पवन चांडक , शिवाजी शिंदे ,शशिकांत मंगरुळे , संजय खडसे , विद्याचरण कडवकर , राजीव सक्करवार हे शासनाकडे पाठपुरावा करून महसूल अधिकाऱ्यांवरील होणाऱ्या अन्यायाबद्दल दाद मागणार असल्याचे समजले .

दैनिक **मराठवाडा पत्र**
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. २० ऑगस्ट २०२५ ● पान ४

# रमाई घरकुल योजनेतील जाचक अटी रद्द करा सर्वपक्षीय शिष्टमंडळाची मागणी

## बीड न.प.सिओ शैलेश फडसे तुघलकी फर्मान रद्द करावे : अशोक वीर

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरासह संपूर्ण राज्यभर रमाई घरकुल आवास योजना ही मागासवर्गीयांसाठी हक्काचे घर मिळावे म्हणून सुरू करण्यात आली आहे. रमाई घरकुल आवास योजनेच्या जीआर व नियमानुसार ज्या लाभार्थ्यांकडे नगरपालिकेचा मालकी हक्काचा पी.टी.आर



आहे. त्या लाभार्थ्यांना घरकुल योजना लागू होते. व ते पात्र लाभार्थी असतात. बीड शहरात अनेक वर्षांपासून रमाई आवास घरकुल योजना चालू असून आज तागायत आहेत अनेकांनी या योजनेचा मालकी हक्काचा पीटीआर देऊन लाभ घेतला आहे.

बीड नगरपालिकेचे नव्याने रुजू झालेले सी ओ शैलेश फडसे यांनी आजबच कारभार सुरू केला आहे. त्यांनी महंमद तुगलकासारखे नवीन नियम नवीन कायदे आणले आहेत. ते तात्काळ रद्द करावेत.जागेची रजिस्ट्री पेपर, पी आर कार्ड, या गोष्टीची आवश्यकता नसताना मागणी करत आहेत. घरकुल हे फक्त मालकी हक्काच्या पी.टी. आर वर मिळते तोच सक्षम पुरावा असतो. तोच ग्राह्य धरून सर्व मंजूर लाभार्थ्यांना घरकुलाचा निधी वितरित करावा अशा मागणीचे निवेदन बीड शहरातील सर्व पक्षीय शिष्टमंडळाने दिले आहे. तात्काळ या मागणीचा विचार करून बीड शहरातील रमाई घरकुल आवास योजनेच्या मंजूर लाभार्थ्यांना निधी वितरित करण्यात यावे अशी मागणी सर्वपक्षीय नेते मंडळीकडून करण्यात आली आहे. या शिष्टमंडळात अशोक वीर, बबन वडमारे, सनी वाघमारे, खुर्शीद आलम, विनोद सवाई, अशोक वाघमारे आदी उपस्थित होते.



# आधार मल्टीस्टेटने सामाजिक बांधिलकी जोपासली : पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने

## आधार मल्टीस्टेटच्या जीवनगौरव पुरस्काराने महागायक सुभाष शेप सन्मानित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

संपूर्ण मराठवाड्यात आर्थिक क्षेत्रात ज्यांचा दबदबा आहे आणि व्यवहारात ज्यांच्याकडे पारदर्शकता व प्रामाणिकपणा आहे. अशा आधार मल्टीस्टेटने सातत्याने समाजातील वेगवेगळ्या प्रतिभा संपन्न व्यक्तिमत्वांना त्यांच्या क्षेत्रातील उत्तुंग कार्याबद्दल सन्मानित केले आहे. खऱ्या अर्थाने समाजाचा चांगुलपणा जपणाऱ्या काही मोजक्याच संस्था आहेत. त्यामध्ये 'आधार'चा समावेश आहे. महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक तथा ज्यांना संगीताची कसली ही परंपरा नाही अशा महागायक सुभाष शेप यांना त्यांच्या २५ वर्षांच्या सांगितिक सेवेतील योगदानाबद्दल जीवनगौरव पुरस्कार आणि कृतज्ञता सोहळा शनिवार, दि.१६ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी आधार मल्टिस्टेट ही सामाजिक बांधिलकी जपणारी संस्था असल्याचे सांगितले. आधार मल्टीस्टेट ही संस्था मुठभर लोकांना मोठी करणारी नव्हे तर श्रमजीवी, कष्टकरी, प्रामाणिक आणि ज्यांना दिवसा उज्ज्वल भविष्याचे स्वप्न पडते आणि तो त्यासाठी संघर्ष करतो अशा गरजू व रस्त्यावर व्यवसाय ▶ उर्वरित पान २ वर

# धुनकेश्वर हे डोंगरपट्ट्यातील तेरा शिवलिंगांपैकी एक प्राचीन दैवत : केशव महाराज पवार

### देवामध्ये भेदभाव करु नका शिव-हरी एकच आहेत.

**वडवणी । प्रतिनिधी**

देवामध्ये कधीही भेदभाव करू नये. शिव-हरी वेगळे नसून ते एकच आहेत.म्हणूनच भेदभाव न करता भक्तिभावाने पूजा केली पाहिजे. ईश्वराला नावं अनेक असली तरी तो सर्वत्र एकच आहे.माणसा-माणसांत, पंथा- पंथात किंवा देव-देवतांमध्ये भेदभाव निर्माण करणे



चुकीचे आहे. समाजामध्ये ऐक्य आणि सौहार्द वाढावे, भक्ति-भावातूनच खरा परमार्थ साधाता येतो. ▶ उर्वरित पान २ वर

# 'खुशी' च्या उपक्रमाने अंध विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमलली खुशी

## विद्यार्थ्यांच्या सर्वागीण विकासासाठी संगणक भेट देणारे: बबलू टेकाळे

**देगलूर । प्रतिनिधी**

शहरातील सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणाऱ्या खुशी सेवाभावी संस्थेच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम घेतले जातात. शहरातील अंध विद्यालय येथे ४७ विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून गणवेश वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे चेहरे आनंद भारावून गेल्याचा क्षण पाहायला मिळाला. ▶ उर्वरित पान २ वर



# श्री सोमेश्वर मंदिर बीड येथे चौथ्या सोमवारी घेतले शेकडो भाविकांनी श्री सोमेश्वर भगवान महादेवाचे दिव्य स्वरूपाचे दर्शन

## विश्वस्तांच्या वतीने फळ या महाप्रसादाचे वाटप देखील सर्व भाविक भक्तांना करण्यात आले

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नामांकित असलेले श्री सोमेश्वर मंदिर या ठिकाणी श्री भगवान महादेवाचे दिव्य स्वरूपाचे दर्शन सर्व भाविक भक्तांनी यथाशक्ती मानस पूजा करून दर्शन घेतले आणि आज चौथा सोमवार असल्यामुळे बीड जिल्ह्यातील व बीड शहरातील ग्रामीण भागातील शेकडो भाविक भक्तांनी श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी बीड येथील सोमेश्वर मंदिरा ठिकाणी आले होते



प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी अतिशय मोठ्या थाटामाटा मध्ये श्रावण महिना उत्सव हा धार्मिक कार्याचे बाबतीत बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र साजरा होताना दिसून येत आहे याच पार्श्वभूमीवर बीड शहरातील सर्वांच्या नवसाला पावणारे व सर्वांच्या इच्छा मनोरात पूर्ण करणारे असे श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर या ठिकाणी श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी आज बीड शहरातील भाविक भक्ताच्या मोठ्या रांगा लागल्या ▶ उर्वरित पान २ वर

# बीडचा फुटबॉलपटू अब्दुल हक चमकला – मद्रास एफसी निवड चाचणीसाठी निवड



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराला अभिमानाचा क्षण लाभला आहे. मिलान बॉईज फुटबॉल क्लबचा उदयोन्मुख खेळाडू अब्दुल हक याची भारतातील प्रख्यात संघांपैकी एक असलेल्या मद्रास एफसीच्या निवड चाचणीसाठी निवड झाली आहे. मद्रास एफसी हे भारतीय फुटबॉलमधील एक मानाचे नाव असून, अब्दुल हकची ही कामगिरी केवळ त्याच्यासाठीच नव्हे तर बीडच्या फुटबॉल जगतातील सर्वांसाठी गौरवास्पद आहे. अब्दुल हकचा प्रवास हा मेहनत, समर्पण आणि ▶ उर्वरित पान २ वर

# सोयाबीन पाण्याखाली शेतकरी आर्थिक संकटात

## पंचनामे करून नुकसानभरपाईची लिंबागणेश येथील शेतकऱ्यांची मागणी : डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

गेल्या ३-४ दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीतील फलोऱ्यापासून शेंगा लागण्याच्या अवस्थेत असलेले सोयाबीन, मुग, उडीद आदी पिके पाण्याखाली गेली आहेत. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिक वाया जाण्याची भीती आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी रामकिसन गिरे, रामचंद्र मुळे, रामदास मुळे, अभिजित गायकवाड, जितेंद्र निर्मळ, बाबु आण्णा वायभट, राजेभाऊ गिरे, श्रीहरी निर्मळ, चिंतामण गिरे, अक्षय वायभट आदींनी केली आहे.



**सोयाबीनला बुरशी लागली; पिक वाया - रामकिसन गिरे**

सलग पावसामुळे सोयाबीनमध्ये पाणी साचल्याने मुळांना बुरशी लागली आहे. मुळांना गाठी येऊन वाढ खुंटली असून पिक वाया गेले आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी रामकिसन गिरे यांनी केली. दरम्यान, रामचंद्र मुळे यांनी मागील २-३ वर्षांपासून शासन पंचनामे करूनही शेतकऱ्यांना नुकसानभरपाई न मिळाल्याचे सांगितले.

**ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसानभरपाई द्यावी - डॉ.गणेश ढवळे**

बीड जिल्ह्यातील बहुतांश गावांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिक पूर्णपणे वाया गेले आहे. शासनाने पंचनाम्याचे आदेश दिले ▶ उर्वरित पान २ वर

# थोडक्यात...

## पर्यावरण क्षेत्रात काम करु इच्छिणाऱ्या पात्र व्यक्तींनी अर्ज सादर करावेत

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे दि. १५ जुलै २०२५ रोजी जिल्हा पर्यावरण समिती गठीत करण्याबाबत बैठक घेण्यात आली होती. या बैठकी दरम्यान पर्यावरण मंत्रालय महाराष्ट्र शासन यांच्या १ सप्टेंबर २०१५ च्या आदेशानुसार जिल्हा पर्यावरण समितीमध्ये पर्यावरण क्षेत्रातील २ तज्ज्ञ प्रतिनिधी तसेच पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या जिल्ह्यातील अशासकीय सेवाभावी संस्थेचे २ प्रतिनिधी नियुक्त करावयाचे आहेत. पर्यावरण क्षेत्रात काम करु इच्छिणा-या पात्र व्यक्तींनी जिल्हाधिकारी बीड या कार्यालयात आवश्यक त्या कागदपत्रासह १५ दिवसाच्या आत अर्ज सादर करावेत, जेणे करुन पात्र व्यक्तींची जिल्हा पर्यावरण समितीमध्ये शासन निर्णयानुसार निवड करुन जिल्हा पर्यावरण समिती गठीत करता येईल, असे उप प्रादेशिक अधिकारी म.प्र. नि. मंडळ जालना तथा समन्वयक बीड जिल्हा पर्यावरण समिती यांनी कळविले आहे.

## हरवलेल्या व्यक्तीबाबत निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस ठाणे श्रीगोंदा,जि. अहिल्यानगर गुरन- २८७/२०२४ कलम ३६३ भादवी प्रमाणे दाखल झालेल्या गुन्हयातील पिडीत अल्पवयीन मुलगी कविता अशोक वामन वय १७ वर्षे ६ महिने रा. गौखेल ता. आष्टी,जि. दि. १४/०३/२०२४ रोजीचे २१.०० ते दि.१५.०३.२०२४ रोजीचे पाहटे ३.०० वाजेच्या दरम्यान श्रीगोंदा कारखाना ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर येथून अज्ञात इसमाने अज्ञात कारणाकरिता पळवून नेले आहे. सदर मुलीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे. नाव सविता अशोक वामन वय १७ वर्षे ६ महिने रा. गौखेल,ता. आष्टी, जि. बीड रंग गोरा,उंची सव्वा पाच फुट, गुलाबी रंगाचा व त्यावर फुले फुले असलेला पंजाबी ड्रेस, पायात काळया रंगाचे सॅडल, उजव्या बाजुच्या गालावर खड्डा. वरील वर्णनाच्या मुलीची माहिती मिळाल्यास किंवा आढळून आल्यास पोलीस ठाणे श्रीगोंदा, पोलीस उपनिरीक्षक पोलीस स्टेशन श्रीगोंदाचे पोलीस उपनिरीक्षक यांच्याशी संपर्क साधावा, असे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मनोहर एच खिदळाकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. कोणास सदर मुलगी दिसल्यास कृपया त्वरित मो.क्र.९८८१७३१७२१ यावर संपर्क साधावा

## अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करून तात्काळ मदत जाहीर करा : बापूसाहेब साळुंखे

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यामध्ये पाठीमागच्या काही दिवसांपासून पावसाची संततधार कायम आहे. त्यामुळे जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी अतिवृष्टी सर्जन्य पाऊस झालेला असून या पावसामुळे अनेक शेती पिकांचे नुकसान झालेले आहे. त्या झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटामध्ये अडकलेला आहे. तरी तलाठी व इतर कर्मचारी यांनी नुकसान झालेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करून अहवाल प्रशासनाकडे सादर करावेत व प्रशासनाने तातडीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी असे विनंती मराठा महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंखे यांनी केली आहे. जिल्ह्यामध्ये मागील काही दिवसांपासून अनेक ठिकाणी अतिवृष्टी सृजन्य पाऊस झाल्या कानाने उभी पिके पाण्याखाली जाऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. तरी सदरील पिकांची तातडीने पाहणी करून पंचनामे करत त्या शेतकऱ्यांना प्रशासनाने व शासनाने तात्काळ आर्थिक हातभार लावावा असे विनंती मराठा महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंखे यांनी केली आहे.

## जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०२३-२४ साठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे अतंर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड मार्फत जिल्हयातील गुणवंत क्रीडापटु गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे / योगदानाचे मुल्यमापन होउन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनातर्फे २०२३-२४ करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार नियम – २०२२ नुसार जिल्हयातील ०१ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक व गुणवंत खेळाडू (०१ पुरुष ०१ महिला व ०१ दिव्यांग खेळाडू) असे एकुण ०४ पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सन २०२३-२४ च्या जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी दिनांक ०१ जुलै २०२३ ते ३० जून २०२४ या कालावधीसाठी खेळाडूची मागील पाच वर्षाची कामगिरी व क्रीडा मार्गदर्शकासाठी मागील दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल. विहित नमुण्यातील अर्ज मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. विहीत नमूण्यातील अर्ज कार्यालयाच्या फलकावर लावण्यात आलेला आहे. बीड जिल्हयातील पात्र असलेल्या मार्गदर्शक व क्रीडा पटुंनी उपरोक्त पुरस्कारासाठी परिपुर्ण अर्ज दि. ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी श्री. अनिकेत काळे, क्रीडा अधिकारी, मो. ९६०४९५९६७८ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, श्री. अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

## चेक बाउन्स प्रकरणी पोलिसाला सहा महिने शिक्षा: ॲड .तेजस नेहरकर

**बीड । प्रतिनिधी**



प्रकरणाची थोडक्यात हाकिकत आशि होती की, फिर्यादी दामोदर रावसाहेब साळुंके रा. बीड यांचे कडून आरोपी किशोर दामोदर डोके रा. बीड पोलीस कॉन्स्टेबल नेमणूक आष्टी पोलीस स्टेशन याने घरगुती अडचण सांगून फिर्यादीकडे तीन लाख रुपये हात उसने देण्याची मागणी केली होती. फिर्यादीने त्याच्यावर विश्वास ठेवून कुठलाही कागदोपत्री पुरावा न बनवता आरोपीला नगदी रोख तीन लाख रुपये दिले होते .याला कोणीही साक्षीदार नव्हते. आरोपीने दिलेला स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा बीड चा चेक फिर्यादीने बँकेमध्ये वटवण्यासाठी टाकला असता आरोपीचे खात्यावर पैसे नाहीत म्हणून तो चेक वापस आला. त्यानंतर फिर्यादीने आरोपीस पैशाची मागणी केली असता आरोपीने पैसे देण्यास नकार दिला. उपरोक्त प्रकरण एडवोकेट तेजस नेहरकर यांच्यामार्फत मा. मुख्य न्याय दंडाधिकारी बीड यांच्या न्यायालयात एन आय ॲक्ट कायद्या नुसार दाखल करण्यात आले त्याचा क्रमांक. एस एस सी. १०२४ / २०२४ असा असून सदरचे प्रकरण साक्षी पुराव्या साठी ▶ उर्वरित पान २ वर